Estd : 1962
'A' Re-accredited by NAAC
(2014) With CGPA-3.16
कार्यालय:0231-2609175/76
फॅक्स :0231 -2691533
ई-मेल :dsw@unishivaji.ac.in

# शिवाजी विद्यापीठ

## राष्ट्रीय सेवा योजना

## विद्यानगर, कोल्हापूर -416 004

प्रा.डॉ.डी.के.गायकवाड
कार्यक्रम समन्वयक

संदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ई-मेलद्वारे दि. १८/०१/२०१६

प्रति,

१. मा. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व रासेयो संलग्न महाविद्यालये,
कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा

२. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व रासेयो संलग्न अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**लक्षवेध : राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**

विषय : विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराकरीता
आपल्या महाविद्यालय / अधिविभागातील ५ स्वयंसेवक व ५ स्वयंसेविका पाठविणेबाबत...

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना द्वारे **दिनांक २२ जानेवारी ते २८ जानेवारी,२०१६ या कालावधीत विद्यापीठस्तरीय विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे.** ज्यामध्ये पर्यावरण व प्राचीन वास्तु रक्षण व संवर्धन, उत्कृष्ठ आरोग्याकरीता योगा-प्राणायम प्रशिक्षण, परिसर स्वच्छता उपक्रम तसेच डिजीटल लिटरसी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाद्वारे डिजीटल लिटरसी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मानस असल्याने सदर विद्यापीठस्तरीय विशेष शिबीरामध्ये डिजीटल लिटरसी प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आलेला आहे. याकरीता आपल्या महाविद्यालय /अधिविभागाद्वारे पाठविण्यात येणा-या विद्यार्थी / विद्यार्थीनींमध्ये संगणक कौशल्ये तसेच संगणक ज्ञान आत्मसात असणा-या विद्यार्थ्यांना प्राधान्याने पाठविण्यात यावे कारण सदर विद्यार्थी / विद्यार्थीनींना रासेयो विशेष शिबीरामध्ये डिजीटल लिटरसी प्रशिक्षण देण्यात येवून प्रशिक्षीत विद्यार्थी / विद्यार्थीनींद्वारे महाविद्यालयीन /विद्यापीठ पातळीवर डिजीटल लिटरसी उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

सबब वरीलप्रमाणे आयोजित विद्यापीठस्तरीय शिबीराकरीता **आपल्या महाविद्यालय /अधिविभागातील ५ विद्यार्थी स्वयंसेवक, ५ विद्यार्थीनी स्वयंसेविका यांना दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत – ताट, वाटी , आंथरून , पांघरून तसेच इतर आवश्यक साहित्यासह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पाठवून देणेत यावे** व शिबीरास उपस्थित राहणेकरीताचा फक्त प्रवास खर्च रा. से. यो. च्या नियमित कार्यक्रम निधीतून करणेत यावा.

कळावे,

आपला विश्वासू

(प्रा.डॉ. डी. के. गायकवाड)
कार्यक्रम समन्वयक